**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ
अकोला

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 28-03-2023**

**बुलढाणा(महाराष्ट्र) साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2023-03-28 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2023-03-29 | 2023-03-30 | 2023-03-31 | 2023-04-01 | 2023-04-02 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 | 0.0 |
| कमाल तापमान (अं.से) | 35.7 | 35.9 | 35.3 | 35.4 | 35.2 |
| किमान तापमान (अं.से) | 20.7 | 21.0 | 21.5 | 21.2 | 20.9 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 62 | 58 | 61 | 63 | 57 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 34 | 31 | 35 | 37 | 34 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 5.0 | 5.0 | 6.0 | 5.0 | 7.0 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 316 | 301 | 318 | 314 | 320 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 2 | 3 | 3 | 3 | 4 |

## हवामान सारांश / चेतावणी:

भारतीय हवामान खात्याने आज वर्तविलेल्या पाच दिवसीय हवामान अंदाजानुसार बुलढाणा जिल्ह्यात येत्या पाच दिवसांत कोरडे हवामान राहण्याची शक्यता आहे.

## कृषि सल्ला:

कोरडे हवामान, वाढत असलेले तापमान लक्ष्यात घेता , शेतकऱ्यांनी शेतातील उभ्या पिकांना, फळबागांना ओलीत सकाळच्या किंवा संध्याकाळच्या वेळेत नियमितपणे करावे, जेणेकरून वाढत्या उष्णतामानाचा पिकांवर विपरीत परिणाम होणार नाही. तसेच उष्णतामानाचा त्रास होऊ नये म्हणून शेतकरी बंधूंनी शेतातील कामे ही प्रामुख्याने सकाळच्या किंवा संध्याकाळच्या वेळी करावी.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

वाढते तापमान लक्षात घेता भुईमुंग व सुर्यफुल पिकाला ४ ते ५ दिवसांच्या अंतराने सकाळच्या किंवा संध्याकाळच्या वेळेत ओलीत करावे.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| भुईमूग | उन्हाळी भुईमुंगावर पाने पोखरणारी अळी किंवा तुडतुड्यांचा प्रादुर्भाव दिसताच लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५% ४ मिली/१० ली. पाणी किंवा क्विनॉल्फॉस २५% २८ मिली/१० ली. पाणी याप्रमाणात फवारणी करावी. पिकाला आऱ्या अवस्थेमध्ये मातीची भर द्यावी जेणेकरून शेंगांची वाढ चांगली होण्यास मदत होईल. तसेच या अवस्थेमध्ये पिकाच्या वाढीसाठी मातीत ओलावा असणे गरजेचे आहे. |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| सूर्यफूल | तापमान वाढत असल्यामुळे सुर्यफुल पिकास पाण्याचा ताण बसू नये म्हणून ४ ते ५ दिवसांच्या अंतराने ओलीत करावे. सुर्यफुल पिकावर तुडतुडे/फुलकीडींचा प्रादुर्भाव आढळून आल्यास ईमिडाक्लोप्रिड १७.८ % या कीटकनाशकाची २.० मिली मात्रा प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| गहू | वेळेवर पेरणी केलेल्या गव्हाचे पिक परिपक्व झाले असल्यास त्याची कापणी करून मळणी करावी. मळणी करताना दाणे फुटणार नाहीत याची काळजी घ्यावी.मळणी केल्यानंतर तयार झालेल्या शेतमालाची सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवण्याची व्यवस्था करावी. |

**फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:**

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| कागदी लिंबू | लिंबू बागेला नियमितपणे शक्य झाल्यास ठिबक सिंचन पद्धतीने ओलीत करावे. फळझाडांची आळे पालापाचोळ्यानी आच्छादित करून घ्यावी जेणेकरून मातीतील ओलावा टिकून राहण्यास मदत होईल. |
| वांगे | वाढते तापमान लक्षात घेता वांगी पिकाला ४ ते ५ दिवसांच्या अंतराने सकाळच्या किंवा संध्याकाळच्या वेळेत ओलीत करावे.वांगी पिकात पानावरील ठिपके व फांद्यावरील चट्टे या रोगाचा प्रादुर्भाव आढळल्यास मॅन्कोझेब २५ ग्रॅम किंवा कार्बनडेन्झीम ५० डब्ल्यू.पी. या कीडनाशकांची १० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| मिरची | वाढते तापमान लक्षात घेता मिरची पिकाला ४ ते ५ दिवसांच्या अंतराने सकाळच्या किंवा संध्याकाळच्या वेळेत ओलीत करावे.मिरची पिकामध्ये फुलकिड्यांचा प्रादुर्भाव नियंत्रित करण्यासाठी स्पिनोसॅड ४५ % प्रवाही या कीटकनाशकाची ४ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| पेरू | वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवन व पर्णोत्सरण या दोन्ही क्रियांचा वेग वाढतो व परिणामी पाण्याचे अधिक प्रमाणात वहन होते. म्हणून पेरू बागेला आवश्यकतेनुसार ओलीत करावे. |
| संत्रा | संत्रा बागेला वाढत्या तापमानात फळगळीमुळे नुकसान पोहोचू नये म्हणून पाणी द्यावे. पानातील अन्नद्रव्यांची कमतरता भरून काढण्यासाठी १३:००:४५ ची १५ ग्रॅम + चीलेटेड झिंक ५ ग्रॅम /लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. |
| कांदा | कांदा पिकामध्ये फुलकिडे आणि बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव लक्षात येताच क्विनॉल्फॉस २५ % प्रवाही १२ मिली + मॅन्कोझेब ७५ % डब्ल्यू.पी. २५ ग्रॅम +सॅन्डोव्हीट स्टीकर ५० मिली/१० ली. पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| टरबूज | परिपक्व झालेली टरबूजाची फळे तोडून घेऊन सावलीत ठेवावी व त्यातली किडग्रस्त ,सडकी फळे वेगळी काढून चांगली फळे बाजारपेठेत नेण्याची व्यवस्था करावी. |

**पशुधन विषयक निहाय सल्ला:**

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | जनावरांना वाढत्या तापमानाचा त्रास होऊ नये म्हणून त्यांच्या गोठ्याच्या छतावर गवताचे किंवा पालापाचोळ्याचे आच्छादन पसरवावे तसेच छतावर पाणी शिंपडावे जेणेकरून गोठ्यामधील तापमान कमी होण्यास मदत होईल. |

**कुकुटपालन विषयक निहाय सल्ला:**

| कुकुटपालन विषयक | कुकुटपालन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| पक्षी | वातावरणातील उष्णतेपासून पक्ष्यांचे संरक्षण करण्यासाठी शेडच्या छताला वरून व भिंतीला बाहेरून चुना किंवा पांढरा रंग लावावा. |

**इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:**

| **इतर (माती / जमीन तयार करणे)** | **इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला** |
|---|---|
| जमीन तयारी | रब्बी हंगामातील पिकांच्या कापणी/काढणीनंतर लगेच शेत नांगरून घ्यावे जेणेकरून मातीतील किडींच्या अवस्था व मातीद्वारे होणाऱ्या रोगांचा प्रतिबंध होण्यास मदत होईल. जमिनीची खोल नांगरणी केल्यास जमिनीत पाणी खोलवर जिरते व त्यामुळे जमिनीतील ओल टिकून राहते. |